



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६७४. वा | रविवार | दि. ०४ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# आ.संजय गायकवाड यांचे राजकीय कवाड ओबीसी व मराठा मिळून बंद करतील- रुपाली पाटील

**वृत्तसंस्था/मुंबई**

राज्याचे मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यास विरोध केला आहे. सरकारच्या या निर्णयाविरोधात आंदोलन करण्याची घोषणा भुजबळ यांनी केली आहे. त्यामुळे शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी यावर संताप व्यक्त करत भुजबळांच्या कंबरेत लाथ मारून त्यांना हाकलून देण्याची भाषा केली. त्यावरून अजित पवार गटातील नेत्या रूपाली ताई पाटील या संजय गायकवाड यांच्याविरोधात आक्रमक झाले आहेत. भुजबळांबाबत केलेल्या वक्तव्यावरून अजित पवार गटाच्या नेत्या रूपाली पाटील यांनी संजय गायकवाड यांच्यावर जोरदार टिका केली आहे. संजय गायकवाड हे स्वतः च ओबीसी असल्याचे माध्यमासमोर येऊन सांगत आहेत. जिभ कापण्याची भाषा करणारा संजय गायकवाड यांच राजकीय कवाड आणि ओबीसी व मराठा मिळून बंद करतील. मराठा बांधवांची किती फसवणूक करणार आहात ? असा सवालही रूपाली पाटील यांनी केला आहे. तसेच ओबीसी व मराठा बांधवात तणाव निर्माण करणारे चेहरे हळूहळू बाहेर पडत आहेत. लाथ बसली असंही रूपाली पाटील यांनी म्हटले आहे. दरम्यान, छगन भुजबळ यांच्यावर केलेल्या टिकेच्या निषेधार्थ पंढरपुरात सकल ओबीसी बांधवांच्या वतीने छत्रपती शिवाजी चौकात संजय गायकवाड यांच्या प्रतिमेला जोडे मारून प्रतिमेचे दहन करण्यात आले. यावेळी संजय गायकवाडांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देण्यात आली. तसेच असे



वक्तव्य पुन्हा केल्यास त्यांना महाराष्ट्रभर फिरणं मुशकील करू व पंढरपुरात आल्यास त्याचे तोंड काळे करू असा इशाराही त्यांनी दिला.

---

# जग्गू डॉन,उन्नती पतसंस्थेचे खटले अंडरट्रायल चालविणार नपोलीस अधीक्षकांची पत्रकार परिषदेत माहिती...

**जनसंचलन/मलकापूर**

जग्गू डॉनप्रकरणात कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून या शेतकऱ्यांचे पैसे परत मिळावे तसेच उन्नती महिला नागरी सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांच्या ठेवी ठेवीदारांना परत मिळाव्यात अर्थात त्या ठेवीची रिकव्हरी व्हावी, असा आमचा मानस असून त्या दृष्टीने दोन्ही गुन्हे न्यायालयात अंडरट्रायल चालावेत, असे जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी देवराम गवळी, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पडोळे, प्रभारी ठाणेदार श्रीधर गुठे यांची उपस्थिती होती. पोलीस अधीक्षक कडासने म्हणाले, जग्गू डॉनप्रकरणात आतापर्यंत नऊ आरोपींना अटक करण्यात आली असून आठ आरोपी सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत. तर नवव्या आरोपीला न्यायालयात हजर करून पोलीस कस्टडीची मागणी करण्यात आली आहे. या तपासात २० लाख रुपये किमतीच्या संशयीत तीन नकली नोटा छापण्याच्या मशीन, ४१ लाख रुपये किमतीचे चार कार, १ लाख २५ हजार रुपये किमतीचे २ मोबाइल व एक टॅब, रोख रक्कम १९ लाख रुपये, ६० हजार रुपये किमतीची एक इलेक्ट्रिक बाइक, असा एकूण ८१ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच जग्गू डॉन याने पीडित शेतकऱ्यांची फसवणूक करून मिळवलेल्या पैशातून केलेली गुंतवणूक अर्थात बोदवड येथे खंडेलवाल नावाचे जिनिंग खरेदीचा सौदा करून २ कोटी १ लाख रुपये ॲडव्हान्स दिले आहे. त्याचप्रमाणे रमेस्ट्रा ग्रीन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी ४६ लाख रुपये गुंतवणूक केली आहे. आरोपी भगवान बबन घुले यांनी शेतकऱ्यांच्या आलेल्या पैशातून याच ग्रीन एनर्जी कंपनीत दहा लाख रुपये गुंतवणूक केली आहे तसेच शेगाव तालुक्यातील आळसना येथे ४५ लाख रुपये किमतीची ४.७५ एकर शेत जमीन खरेदी केली आहे. या स्थावर मालमत्ता कायदेशीर जप्ती करण्याकरिता फौजदारी कायदा सुधारणा अध्यादेश १९९४ कलम ३ प्रमाणे विद्यमान न्यायालयातील अर्ज दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी आमची कायदेशीर कार्यवाही सुरू असून शेतकऱ्यांचे पैसे शेतकऱ्यांना परत मिळावे हाच आमचा मानस आहे. तसेच उन्नती महिला नागरी सहकारी पतसंस्थेत झालेल्या घोटाळाप्रकरणी पतसंस्थेच्या अध्यक्षा अंजली पंत, लेखापाल रमेश तांदुळे व शाखा व्यवस्थापक राजेश चव्हाण हे आरोपी असून यापैकी अंजली पंत फरार आहे, रमेश तांदुळे ३ फेब्रुवारीपर्यंत पीसीआरमध्ये आहे तर राजेश चव्हाण सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत बुलढाणा जिल्हा कारागृहात आहे. या पतसंस्थेचे विशेष लेखापरीक्षक वसंत प्रभाकर राठोड यांनी वैधानिक लेखापरीक्षण केले असून लेखापरीक्षण अहवालानुसार संस्थेच्या अध्यक्षा अंजली पंत यांनी ५ कोटी २४ लाख ८० हजार १८० रुपये व लेखापाल रमेश कांबळे यांनी १ कोटी ७ लाख १ हजार ९७२ रुपये असा एकूण ६ कोटी ३१ लाख ८२ हजार १५२




रुपयांचा अपहार केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाखा व्यवस्थापक राजेश चव्हाण हा लेखापरीक्षण अहवालात कोठेही दोषी आढळून आलेला नसताना अवसायक यांच्याकडून वेळोवेळी गुन्ह्याशी संबंधित माहिती प्राप्त करून घेऊन तसेच संस्थेच्या आदर्श उपविधी व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे शाखा व्यवस्थापक यांनी पूर्णपणे उल्लंघन केल्याचे दस्तऐवज, पुरावे तपासामध्ये प्राप्त झाल्याने त्यास गुन्ह्यात सह आरोपी निष्पन्न करून अटक करण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक कडासने यांनी सांगितले.

# चिखली तालुका महसूल चे टॉप टेन चे शिल्पकार तहसीलदार सुरेशजी कव्हळे यांची बदली...



**जनसंचलन/ चिखली**

चिखली महसुलीचे महाराष्ट्रातून ज्यांनी चिखली चा कारभार महाराष्ट्र तुन टॉप टेन मध्ये आणला होता असे चिखली चे न्याया दंडाधिकारी सुरेशजी कव्हळे यांची २/०२/२०२४ रोजी शासकीय आदेशानुसार अकोला येथे बदली झालेली आहे ज्या अधिकाऱ्यांनी महसूलचे नाव पूर्ण तळघळातल्या माणसाचे काम करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा सुट्टीचा दिवस न बाळगता सर्वसामान्य लोकांचे काम केल्यामुळे चिखलीचे तहसीलदार सुरेश जी कव्हळे गरजू व सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहोचले होते त्यामुळे त्यांच्याविषयी एक सर्व साधारण लोकांमध्ये आस्ता निर्माण झाला होती त्यातच शासकीय नियमानुसार चिखली तहसीलचे तहसीलदार सुरेश जी कव्हळे यांची बदली अकोला येथे झाल्याची बातमी दोन फेब्रुवारी २०२४ रोजी माहिती चिखली तालुक्यातील लोकांना मिळताच हळहळ व्यक्ती केले तसेच सर्व कर्मचारी यांनी सुद्धा हळहळ व्यक्त केली आहे सुरेश जी कव्हळे यांच्या कामाचा ठसा चिखली महसुली सूत्र हाती घेतच दिसुन आला होता सर्वसामान्यासाठी वाचनालय इमारतीच्या पटगांमध्ये सर्व झाडे लावून इमारतीचे शेभीकरण महसूल कार्यालयात आलेल्या लोकांना शुद्ध पाणी हॉलमध्ये कामानिमित्त आलेल्या लोकांना वाचण्यासाठी महापुरुषाची पुस्तके व मनोरंजनासाठी टीव्ही संच पिण्यासाठी स्वच्छ पाणी त्यामुळे चिखली महसूलचा चेहरा मोहरा बदलून टाकण्यात चिखली तहसीलचे तहशिलदार सुरेशजी कव्हळे यांचा सिंहाचा वाटा होता चिखली तालुक्यामध्ये शासकीय कार्यालय काय असते याची जिवंत उदाहरण लोकांपर्यंत नेऊन टाकले होते चिखली शासकीय कार्यालय आनंदमय करणारे तहसीलदार म्हणून यांची ओळख तयार झाली होती चिखली तहसीलचे लोकप्रिय तहसीलदार सुरेश जी कव्हळे यांची राज्य सरकारने आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोला येथे बदली झाली आहे त्यांच्या जागेवर अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील संतोष काकडे हे नवे तहसीलदार चिखली येथे येणार आहेत

# शिंदे गुरुजी कन्या विद्यालय बुलढाणा येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न...



**जनसंचलन/बुलढाणा**

शिंदे गुरुजी कन्या विद्यालय बुलढाणा येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले.डॉ दिपाली ताई कोथळकर कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या . त्यांनी महिलांना व पालकांना आरोग्य विषयी व मुलांच्या पोषणाविषयी मार्गदर्शन केले. शिंदे गुरुजी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थीनी प्रामुख्याने ग्रामीण भागातल्या असून वस्तीगृहात राहतात.कोणतेही विशेष शिक्षण किंवा प्रशिक्षण नसतांना शाळेच्या मुलींनी विविध अंगभूत कलांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. मुलींची ग्रामीण पार्श्वभूमी पाहता त्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने शाळेमध्ये होत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात महीला व पालक वर्ग कार्यक्रमात उपस्थित होता. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ संजीवनी ताई शेळके यांनी पालकांशी संवाद साधताना, शिक्षणासोबतच संस्कार व संस्कृती मुलींमध्ये रूजविण्याचे आवाहन केले

# सांघिक खेळांच्या आयोजनामुळे सामाजिक एकोपा निर्माण होतो...



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

अमोना येथे खंडोबा यात्रेनिमित्त कबड्डीच्या सामन्यांचे उद्घाटक म्हणुन बोलत असताना राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ पुढे म्हणाले की खेळाच्या संघांमध्ये विविध जाती धर्माचे तरुण एकत्र येतात आणि सांघिक भावना निर्माण होतात. त्यांच्या मधला संवाद वाढतो आणि एक सक्षम पिढी देशाला मिळते. ग्रामीण भागातील खेळाडूंमधील कला गुण विकसित होण्यास होण्यास मदत होते. आमोना गावामध्ये दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुध्दा खंडोबा यात्रा अतिशय मोठ्या प्रमाणात भरवण्यात आली दिवसभर शंकरपटाचे भव्य आयोजन करण्यात आले आणि सायंकाळी कबड्डी चे सामने खेळल्या गेले ह्यामध्ये जिल्ह्यासह जिल्ह्याच्या बाहेरच्या संघांनी सुध्दा सहभाग घेतला. कार्यक्रमाचे उद्घाटन गजानन वायाळ यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून पप्पूसेठ राजपूत ,शिवाजी गाडेकर,विष्णुभाऊ घुबे,गौतम साळवे ,शामभाऊ जाधव,भगवान रक्ताडे सर,दिलीपमामा शितोळे ,अंकुश थुट्टे,अक्षय सुरुशे,गोपाल सुरुशे,भागवत सुरुशे,सरपंच प्रल्हाद ईंगळे,लहुभाऊ वानखेडे,शिवदास भांदर्गे ,सुनिताताई ईंगळे-पो-लीस पाटिल,शालेय व्यवस्थापण समिती जि.प.अमोना,तंटामुक्ती अध्यक्ष-गजानन वाघ,राजुभाऊ जायभाये व गावकरी उपस्थित होते.

# डोणगाव येथे दोन गटांत तुंबळ हाणामारी!

## दोन्ही गटांतील १३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल...

**जनसंचलन/ डोणगाव**

दुकानाच्या वादातून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना १ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. याप्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांच्या १३ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. डोणगाव बसस्थानकावर हॉटेल संचालक नरेन चव्हाण आणि सीएसपी सेंटर ध्रुवल गजानन सातपुते यांच्यात वाद झाला, याप्रकरणी ध्रुवल गजानन सातपुते यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ज्ञानेश्वर टाले राहणार आरेगाव, देवेंद्र आखाडे, वैभव आखाडे, साजन शहा, भागवत आखाडे यांनी हॉटेलमध्ये येऊन साहित्याची फेकाफेक करून मारहाण केली. तक्रारीवरून पाचही आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केल आहे. दुसऱ्या गटाच्या देवेंद्र रावसाहेब आखाडे याने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी गजानन सातपुते, छाय सातपुते, रोहिणी सातपुते, ध्रुवल सातपुते, वैष्णव सातपुते, नरेन चव्हाण, निशा चव्हाण, मंगेश इंगळे रा. अकोला आदींनी कोयता घेऊन मारहाण केली. याप्रकरणी आठही जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केल आहे. पुढील तपास पीएसआय संदीप सालवे करीत आहेत.आरोपींपैकी साजन शाह, देवेंद्र आखाडे, भागवत आखाडे, ध्रुवल सातपुते, मंगेश इंगळे यांना अटक करण्यात आली आहे.

# चिखलीत जिनिंगला आग; लाखो रुपयांचे नुकसान

**जनसंचलन/ चिखली**



स्थानिक एमआयडीसी स्थित जय गुरू गणेश जिनिंगमध्ये २ फेब्रुवारीच्या दुपारी दीड वाजेच्या सुमारास आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. चिखली एमआयडीसीमधील अभय जैन यांचे जय गुरू गणेश जिनिंग प्रेस हाऊसमध्ये कापसाच्या गाठी बनविण्याचे काम सुरू होते. या कामादरम्यान शॉर्टसर्किट झाल्याने सदर जिनिंगमध्ये अचानकपणे आगडोंब उसळला. यामध्ये गुरु गणेश जिनिंग व रोकडोबा जिनिंगमधील कापूस, सरकी तसेच संबंधित जिनिंगमधील मशनरी आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने लाखोंचे नुकसान झाले आहे. याबाबत माहिती मिळताच चिखली नगरपालिकेचे अग्निशमन वाहन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाने वेळीच या आगीवर नियंत्रण मिळविल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, यामध्ये जिनिंगचे मोठे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनास्थळी पीएसआय सविता मोरे पाटील व एएसआय प्रमोद हुसे दाखल झाले होते.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आरक्षणाच्या मुद्यावरून सत्ताधाऱ्यांचे राजकारण सुरू - सुषमा अंधारे

## लोणार,दुसरबीड येथे झाल्या सभा : सरोवराचीही केली पाहणी



**जनसंचलन/ लोणार**

सध्या आरक्षणाच्या मुद्यावरून सत्ताधारी राजकारण करीत असून, मूळ प्रश्नांना बगल देण्यासाठी अकारण हा वाद उकरला जात असल्याचे प्रतिपादन शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी १ फेब्रुवारी रोजी लोणार येथे केले. राज्यातील ३५ विधानसभा मतदारसंघांतून जाणाऱ्या मातृतीर्थ ते शिवतीर्थ या मुक्त संवाद यात्रेच्या अनुषंगाने १ फेब्रुवारी रोजी त्यांची लोणारमध्ये सभा झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हा प्रमुख जिलंधर बुधवत, उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, छगन मेहेत्रे, नरेंद्र कराळे, डॉ. गोपाल बच्छिरे, दीपक मापारी, गोपाल मापारी, श्रीकांत मादनकर, लुकमान कुरेशी, राजेश मापारी, भूषण मापारी, साहेबराव पाटोळे यांच्यसह अन्य उपस्थित होते. जुनी पेन्शन योजना, वाढती महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचा प्रश्न, शेतीमालाला भाव या मुद्यावरून लक्ष भटकविण्याचे काम अशा माध्यमातून सुरू असल्याचे शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यावेळी म्हणाल्या. धोरणात्मक निर्णय घेत नसल्याचे सांगत त्यांनी टीका केली. सोबतच केवळ उद्धव ठाकरे यांच्यावरच टीका केली जात असल्याचे त्या म्हणाल्या. सत्तेत नसताना यांनी काढलेल्या कृषी दिंडीचाही यांना विसर पडल्याचे त्या म्हणाल्या. दरम्यान, स्वायत्त संस्थांना स्वतंत्रपणे काम करू दिले जात नसल्याचेही अंधारे म्हणल्या

# धानोरा येथे लाकडाने मारहाण, युवक गंभीर

**जनसंचलन/ धानोरा**

येथून जवळच असलेल्या धानोरा येथे जेसीबीवर चालक म्हणून न गेल्याच्या कारणावरून एकाच चौघांनी बेदम मारहाण केल्याची घटना ३१ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी किनगाव राजा पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. धानोरा येतील गजानन घोरपडे (३२) यास परमेश्वर विष्णू वायाळ यांनी ३१ जानेवारी रोजी जेसीबीवर चालक म्हणून बोलावल्यानंतरही तो गेला नाही. त्यामुळे परमेश्वर विष्णू वायाळ यांनी त्याला लाकडाने जबर मारहाण करून गंभीर जखमी केले. सोबतच विष्णू सीताराम वायाळ, गीताई विष्णू वायाळ, स्वाती परमेश्वर वायाळ यांनी त्यास लाथाबुक्क्यांनी मारल्याचे यासंदर्भात जखमी झालेल्या गजाननचे वडील दगडू नामदेव घोरपडे यांनी किनगाव राजा पोलिसात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. जखमी युवकास छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. दरम्यान, याप्रकरणी किनगाव राजा पोलिसांनी प्रकरणातील आरोपींना ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी मारहाण करून शिवीगाळ करून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# वाहनाच्या धडकेत इसम ठार...




**जनसंचलन/मोताळा**

मोताळा-मलकापूर रोडवरील शेलापूर जवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत मोटारसायकलवरील इसम घटनास्थळावरच ठार झाल्याची घटना १ फेब्रुवारीच्या रात्री ९ वाजेदरम्यान घडली. याबाबत सविस्तर असे की, सातगाव भुसारी येथील मूळ रहिवाशी सापल्य अंबादास घाडगे (वय-४५) हे मुलाच्या शिक्षणासाठी बुलडाणा येथे राहतात. १ फेब्रुवारीच्या रात्री ते त्यांच्या मोटारसायकलवरुन मलकापूर येथून बुलडाण्याकडे येत असतांना रात्री ९ वाजेदरम्यान त्यांनाअज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. त्यामध्ये त्यांचे मेंदूला मार लागल्यामुळे त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. बोराखेडी पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळावर जावून पंचनामा करुन प्रेत सामान्य रुग्णालय बुलडाणा येथे पोस्टमार्टमसाठी पाठविण्यात आले. मृतक सापल्य घाडगे हे आशाबाई अंबादास घाडगे यांचा लहान मुलगा होता. त्यांचेवर २ फेब्रुवारी रोजी सातगांव भुसारी या त्यांच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले.

# खामगाव-जालना रेल्वेमार्गाबाबत सरकारकडून नुसती दिशाभूल!

## चिखली तालुका विकास संघर्ष समितीचा गंभीर आरोप...

**जनसंचलन/ चिखली**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चिखली येथील त्यांच्याच पक्षाच्या मेळाव्यात, खामगाव-जालना रेल्वेमार्गासाठी राज्याच्या वाट्याचा ५० टक्के हिस्सा लवकरच रेल्वे बोर्डाकडे भरू, असे आश्वासन दिले होते. परंतु, या आश्वासनाचा विसर आता मुख्यमंत्र्यांना पडलेला आहे. हे सरकार रेल्वेमार्गाबाबत नुसती दिशाभूल करत आहे, असा घणाघाती आरोप करून, हा रेल्वेमार्ग चिखली तालुक्यासाठी औद्योगिक व आर्थिक भरभराट आणणारा ठरणार आहे. त्यामुळे चिखली तालुका विकास संघर्ष समितीच्यावतीने आम्ही चिखली तहसीलसमोर सत्याग्रह व साखळी उपोषणास बसलेल्या आंदोलकांना पाठिंबा जाहीर केला असून, सरकारने जिल्हावासीयांची दिशाभूल थांबवावी, अन्यथा आगामी निवडणूक सरकारला दणका देणारी ठरेल, असा इशारा चिखली तालुका विकास संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष कैलास आंधळे, कार्यकारी अध्यक्ष सुनील अंभोरे, उपाध्यक्ष महेंद्र हिवाळे यांनी दिला आहे. खामगाव-जालना रेल्वेमार्गासाठी सत्याग्रह व साखळी उपोषण आंदोलन करणार्या रेल्वे लोक आंदोलन समितीच्या आंदोलकांची चिखली तालुका विकास संघर्ष समितीच्या पदाधिकार्यांनी आज (दि.३ फेब्रुवारी) भेट घेतली, व समितीच्यावतीने त्यांच्या आंदोलनास सक्रीय पाठिंबा जाहिर केला. हा रेल्वेमार्ग चिखली तालुक्याचा विकास घडवून आणणारा ठरणार आहे. शेती, उद्योग व दळणवळण यादृष्टीने हा रेल्वेमार्ग होणे ही चिखली तालुक्याच्यादृष्टीने अतिशय महत्वाची बाब आहे. या रेल्वेमार्गाबाबत लोकप्रतिनिधींनी भलीमोठी आश्वासने दिली होती. या आश्वासनांची पूर्तता जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी केलेली नाही. त्यामुळे जनमत संतप्त आहे.




चिखली तालुका विकास संघर्ष समिती ही तालुक्याच्या विकासासाठी संघर्ष करते. मुख्यमंत्र्यांनी तातडीने राज्याच्या वाट्याचा ५० टक्के हिस्सा केंद्रीय रेल्वेबोर्डाकडे भरावा, व या रेल्वेमार्गाला चालना द्यावी, अन्यथा चिखली तालुक्यातील मतदार या सरकारला आपले मतदान करणार नाही, असा इशारा यावेळी संघर्ष समितीचे कार्यकारी अध्यक्ष सुनील अंभोरे व कार्याध्यक्ष कैलास आंधळे यांनी दिला आहे. यावेळी संघर्ष समितीच्यावतीने रेल्वे लोक आंदोलन समितीचे आंदोलनकर्ते संतोष लोखंडे व रेणुकादास मुळे यांना पाठिंब्याचे पत्र सुपूर्त करण्यात आले.

# शेतकऱ्यांसाठी एक काय दहा वर्षात तुरुंगात जाण्यास तयार आहे : रविकांत तुपकर

**जनसंचलन/जळगाव जामोद**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काही नेत्यांनी मला वर्षभर तुरुंगात. डांबण्याचा घाट घातला आहे. पण ज्या पद्धतीने गावगाडयातील शेतकरी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करीत आहेत, त्या प्रेमाखातीर एक काय दहा वर्ष तुरुंगात जाईल पण न्याय्यहक्काची लढाई सोडणार नाही, अशी ग्वाही शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी जळगाव जामोद तालुक्यातील सातळी येथे बोलताना दिली. जळगाव जामोद तालुक्यातील सातळी येथे १ फेब्रुवारी रजी रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात शेतकरी-कष्टकरी-मजुर व तरुणांचा भव्य असा ह्रएल्गार परिवर्तन मेळावाफ पार पडला. युवा आंदोलक अक्षय पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी या मेळाव्याचे उत्कृष्ट आयोजन केले होते. मेळाव्याआधी ग्रामस्थांनी रविकांत तुपकर यांना घोड्यावर बसवून त्यांची संपूर्ण सातळी गावातुन जंगी मिरवणूक काढली. प्रत्येक घरासमोर माय-माऊल्यांनी रांगोळी काढून, पणत्या लावून स्वागत केले तसेच माय-माऊल्यांनी रविकांत तुपकरांचे औक्षण केले. यावेळी बोलतांना रविकांत तुपकर म्हणालेकी, लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काही नेत्यांनी मला वर्षभर तुरुंगात डांबण्याचा घाट घातला आहे. पण ज्या पद्धतीने गावगाडयातील शेतकरी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव करीत आहेत, त्या प्रेमाखातीर एक काय दहा वर्ष तुरुंगात जाईल पण न्याय्यहक्काची लढाई सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. सरकार शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला तयार नाही तर लोकप्रतिनिधीही शेतकऱ्यांच्या समस्यावर ब्र शब्दही काढत नाहीत. त्यामुळे आता आपल्या न्याय्य हक्कासाठीआपल्यालाच लढावे लागणार आहे. म्हणून आपण सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्या साठी लढा देत आहोत. परंतु शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचे काम काही सत्ताधारी नेते करत आहेत त्यामुळे येणाऱ्या लोकसभानिवडणुकीत त्यांना शेतकऱ्यांचा एकजुटीचा दणका दाखवून द्या, असे आवाहन यावेळी रविकांत तुपकरांनी केले. यावेळी जेष्ठ शेतकरी नेते गजाननजी अमदाबादकर, श्याम अवथळे, अमोल



राऊत, सचिन शिंगोटे, निलेश खूपसे, दिपक पाटील-अढाव, अस्लम शेख, शिरू पाटील, वैभव जाणे, अश्फाक देशमुख, अजय गिरी, सदाशिव जाणे, प्रणव देशमुख, आकाश अटोळे यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.या मेळाव्याला परीसरातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# बूथ कमिटी सदस्यांचा मेळावा ही लोकसभा निवडणुकीच्या विजयाची नांदी!

## वन बुलडाणा मिशनच्या मेळाव्यात संदीप शेळकेंचे प्रतिपादन...




जनसंचलन/बुलढाणा

वन बुलडाणा मिशनच्या बूथ कमिटी सदस्यांचा हा भव्य मेळावा म्हणजे आगामी लोकसभा निवडणुकीतील आपल्या विजयाची नांदी आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी आपण सुरू केलेल्या वन बुलडाणा मिशन या राजकीय लोकचळवळीला गावखेड्यात जोरदार प्रतिसाद मिळत आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आजघडीला आमची निवडणूक जर रस्ते आणि नाल्या या मुद्द्यावर होत असेल तर ही खेदाची बाब आहे. वन बुलडाणा मिशनने त्यापलीकडे जावून जिल्हाचा सर्वांगीण विकास हे ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे. लोकप्रतिनिधींनी ज्यांच्या भरवश्यावर निवडून आलो अशा लोकांना सन्मान देणे गरजेचे आहे. मायबाप जनतेने संधी दिली तर आपण खासदार म्हणून नव्हे तर लोकसेवक म्हणून काम करणार असल्याचे प्रतिपादन वन बुलडाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले. वन बुलडाणा मिशनच्या वतीने ३ फेब्रुवारीला बुलडाण्यात आयोजित बूथ कमिटी सदस्यांच्या मेळाव्यात संदीप शेळके बोलत होते. बुलडाणा शहरातील चिखली रोडवरील साईकृपा लॉन्सवर संपन्न झालेल्या या मेळाव्याला जिल्हाभरातील प्रत्येक गावातील बूथ कमिटीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बूथ कमिटी सदस्यांना संबोधित करतांना संदीप शेळके म्हणाले की, ही लढाई जिल्ह्याच्या विकासासाठी आहे. या लढाईत तुम्ही आणि मी मावळे म्हणून उतरलो आहोत. जिल्हाचा विकास हे काही बाजारबुणग्या लोकांचे काम नाही असे संदीप शेळके म्हणाले. वन बुलडाणा मिशन ही परिवर्तनाची चळवळ आहे. मात्र परिवर्तन म्हणजे केवळ चेहरा बदलणे नाही, संदीप शेळकेंना खासदार करणे म्हणजे परिवर्तन नाही तर जिल्ह्याचा धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, पर्यटनदृष्ट्या, सांस्कृतिक सर्व प्रकारचा विकास ही आमची परिवर्तनाची संकल्पना आहे असे संदीप शेळके म्हणाले. आमच्या जिल्ह्यात सोयाबीन कापूस या पिकांवर अवलंबून असलेले शेतकरी आहेत. सोयाबीन कापसाला भाव नाही. पण सोयाबीन कापूस पट्ट्यातून संसदेत गेलेले खासदारांनी या विषयावर काय काम केलं हे त्यांना विचारलं पाहिजे. नुकताच अर्थसंकल्प सादर झाला, पर्यटनासाठी २४०० कोटींची तरतूद झाली पण त्यातून आमच्या लोणार सरोवराला काय मिळणार? मातृतीर्थ सिंदखेडराजाला काय मिळणार? असा सवाल आपण इथल्या लोकप्रतिनिधींना केला पाहिजे असे संदीप शेळके म्हणाले. वन बुलडाणा मिशन ही चळवळ सुरू केली तेव्हा इथले प्रस्थापित आपल्यावर हसत होते, आता मात्र आपल्याला गावखेड्यातून मिळणारा प्रतिसाद पाहून, आजचा हा बूथ कमिटी सदस्यांचा मेळावा पाहून त्यांना हादरे बसत आहेत असे संदीप शेळके म्हणाले. साडेअकरा वाजेपर्यंत हवा येऊ द्या कार्यक्रम चालतो... खेळ पैठणीचा हा कार्यक्रम १५ मिनिटे उशिरापर्यंत चालला म्हणून पोलिसांनी आमच्यावर गुन्हे दाखल केले. मात्र तिकडे नेत्यांच्या वाढदिवसाला चला हवा येऊ द्या कार्यक्रम रात्री साडेअकरापर्यंत चालला. रात्री १२ वाजता तलवारीने केक कापला तरी ते लोकप्रतिनिधी असल्याने त्यांच्यावर गुन्हा नाही असे म्हणत संदीप शेळके यांनी नाव न घेता खा.जाधव यांच्यावर निशाणा साधला.





पोलिसांनी असा भेदभाव करणे बरे नाही असेही ते म्हणाले. दरम्यान येत्या १० फेब्रुवारीपासून आपण जिल्ह्यात परिवर्तन रथयात्रा काढणार आहोत. प्रत्येक तालुक्यात गावागावात जाणार आहोत, अशी घोषणा यावेळी संदीप शेळके यांनी केली. लोकसभा निवडणुकीत वन बुलडाणा मिशनच्या एका कार्यकर्त्यांने २५ घरांची जबाबदारी स्वतःच्या खांद्यांवर घ्यावी, येणाऱ्या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान करून घेण्यावर भर द्यावा, असेही संदीप शेळके यावेळी म्हणाले. या मेळाव्याचे प्रास्ताविक पुरुषोत्तम जाधव , सूत्रसंचालन गणेश धुंदळे यांनी तर आभार नितीन उबाळे यांनी मानले. या मेळाव्यात प्रारंभी गाव खेड्यातून आलेल्या बूथ कमिटी सदस्यांनी, तालुका समन्वयक यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा.अनिल ढगे, मेजर सुरोशे, सागर सिरसाठ, समाधान शेळके , रावसाहेब देशमुख यांची भाषणांनी बूथ कमिटी सदस्यांना चांगलेच स्फुरण चढले होते..

# श्रेष्ठींना वाटल्यास भाजप बुलढाणा लोकसभेची जागा मागू शकते!

## जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटेंची माहिती : बूथनिहाय होणार विश्लेषण

जनसंचलन/बुलढाणा

पक्ष श्रेष्ठींना वाटल्यास भाजप बुलढाणा लोकसभेची जागा मागू शकते. पक्षामध्ये त्यादृष्टीने चिंतन सुरू असून, गाव चलो अभियानांतर्गत बुलढाणा लोकसभा मतदार संघातील १९५१ बूथस्तरावर पूर्वी प्राप्त मतदानाची तीन स्तरावर वर्गवारी करण्यात येऊन सूक्ष्म नियोजनही करण्यात येत असल्याचे वक्तव्य भाजपाचे जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे यांनी बुलढाणा येथे केले. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी भाजपचे गाव चलो अभियान ४ फेब्रुवारीपासून राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेमध्ये ३ फेब्रुवारी रोजी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हे वक्तव्य केले. यावेळी भाजपचे बुलढाणा लोकसभा प्रमुख तथा माजी आमदार विजयराज शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. गतकाळात महायुतीच्या उमेदवाराच्या कामाचा लेखाजोखा तथा परफॉर्मन्सही




तपासला जात असल्याचे सांगत पक्षामध्ये सर्व बाजूंनी चिंतन होत असल्याचे डॉ. मांटे पुढे बोलतांना म्हणाले. ते पुढे म्हणाले की, पक्ष संघटन मजबूत करण्यासोबतच जिल्ह्यातील प्रत्येक गावात प्रवासी कार्यकर्ता हा २४ तास थांबणार असून गावातील प्रत्येक बूथवर महायुतीच्या उमेदवाराला मिळालेल्या मतदानाचे ए, बी आणि सी अशा तीन टप्प्यात वर्गवारी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्या आधारावर काही नियोजन ठरविण्यात येईल. गाव चलो अभियान १८ एप्रिलपर्यंत राबविणार भाजपाचे नेते चैनसुख संचेती, आ. डॉ. संजय कुटे, अॅड. आकाश फुंडकर, श्वेता महाले यांच्यास भाजपचे पदाधिकारीही जिल्ह्यातील किमान एका गावात जाऊन या उपक्रमात सहभागी होतील, असे त्यांनी स्पष्ट केले. या संदर्भाने एकदिवस अगोदरच मुंबईत एक महत्वपूर्ण बैठक झाल्याचेही ते म्हणाले. यासोबतच केंद्रीय योजनांची ग्रामपातळीवर झालेली अंमलबजावणी याचीही माहिती घेण्यात येईल. १८ एप्रिलपर्यंत हे गाव चलो अभियान राबविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी आ. विजयराज शिंदे यांनीही या उपक्रमाची माहिती दिली.

# खंडणी मागणाऱ्या सात जणांवर गुन्हे दाखल...




जनसंचलन/ धाड

येथील दूध व्यावसायिकाला शिवस्मारकाच्या नावाखाली अवाढव्य रकमेची मागणी केली. मागणी पूर्ण न केल्यास दुधाचे नुकसान करू तसेच दुधाचे टँकर रस्त्यावर फिरू देणार नाही, आदी धमक्यांमुळे व्यवसाय करणे अवघड झाल्यामुळे व्यावसायिकाने डेअरी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत अमर दूध डेअरीचे मालक अमरलाल परमानंद खत्री यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सात जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. अमरलाल परमानंद खत्री, रा.बोदवड यांनी २ रोजी धाड पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी वैभव मोहिते, संतोष,उबाळे, अनिल वाघ, गणेश जाधव,प्रवीण गुजर, अजय शिंदे, सुनील वाघ सर्व (रा. धाड) यांनी पुतळ्याच्या सुशोभीकरणासाठी ११ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचे म्हटले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958